| MHYA070003212024 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | १६/०२/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | : | १६/०२/२०२४ |
| | निकाल दिनांक | : | १४/०७/२०२६ |
| | कालावधी | : | ०२ वर्ष ०४ म. २८ दि. |

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दारव्हा, जि. यवतमाळ यांचे न्यायालय**

(पीठासन अधिकारी श्री निलेश ल. पाटील)

**नियमित दिवाणी दावा क्र. ३०/२०२४**

**निशाणी क्र. ४४.**

**मोतीराम सुर्यभान शेंद्रे,**

**वय:–** ६३ वर्षे, **धंदा:–** शेतमजूरी,

**रा.** महागाव (कसबा), ता. दारव्हा, जि. यवतमाळ.

ह.मु. लाल बहादुर शास्त्री गणित, पिंपळगाव रोड, यवतमाळ.

**..........वादी**

**.....विरुध्द.....**

१) **सरस्वती वसंतराव शेंद्रे,**

**वय:–** ६४ वर्षे, **धंदा:–** शेती,

२) **संदिप वसंतराव शेंद्रे,**

**वय:–** सज्ञान, **धंदा:–** शेती,

३) **प्रविण वसंतराव शेंद्रे,**

**वय:–** सज्ञान, **धंदा:–** शेती,

४) **अमोल वसंतराव शेंद्रे,**

**वय:–** सज्ञान, **धंदा:–** शेती,

५) **सौ. मंगला संतोष सहारे,**

**वय**:– सज्ञान, **धंदा:–** घरकाम,

६) **श्रीमती सुलोचना बाबाराव शेंद्रे,**

**वय:–** ५० वर्षे**, धंदा:–** शेती,

७) **गजानन बाबाराव शेंद्रे,**

**वय:–** सज्ञान, **धंदा:–** शेती,

८) **राजू बाबाराव शेंद्रे,**

**वय:–** सज्ञान, **धंदा:–** शेती,

९) **विजय बाबाराव शेंद्रे,**

**वय:–** सज्ञान, **धंदा:–** शेती,

१०) **सौ. रूपाली विजय फुन्ने,**

**वय:–** सज्ञान, **धंदा:–** घरकाम,

**रा.** हिवरी, ता. जि. यवतमाळ,

११) **शंकुतला सुर्यभान शेंद्रे,**

**वय:–** ७० वर्षे, **धंदा:–** मजूरी,

**रा.** प्रतिवादी क्र. १ ते ९ व ११ रा. महागाव कसबा,

ता. दारव्हा, जि. यवतमाळ

**............. प्रतीवादी**

-----------------------------------------------------------------------------------

१. **वादीतर्फे**: विधीज्ञ श्री. एन. बी. सायरे

२. **सर्व प्रतीवादी तर्फे**: विधीज्ञ श्री. जी. पी. ठाकरे

-----------------------------------------------------------------------------------

# न्या य नि र्ण य

## (१४ जुलै, २०२६ रोजी पारीत)

वादीने प्रस्तुतचा दावा हा दावामिळकतीचे वाटप होवुन स्वतंत्र्य ताब्यात मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

**०२.** वादीचे वडील सुर्यभान फागुजी शेंद्रे याचे दिनांक ३०/०७/२००५ रोजी निधन झाले असून त्याच्या मृत्यूनंतर वादी, त्यांची आई गिरजाबाई, भाऊ वसंतराव व बाबाराव तसेच बहिण शंकुतला हे कायदेशीर वारस राहिले. पुढे वादीची आई व दोन्ही भाऊ यांचेही निधन झाले असून त्यांच्या वारसांमध्ये सदर प्रतिवादींचा समावेश आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यात रक्तसंबंध असून ते सर्व मयत सुर्यभान यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत सुर्यभान याच्या मालकीची मौजे महागाव कसबा, ता. दारव्हा येथील गट क्र. ३६५ क्षेत्र ही शेतजमीन आहे. यापुढे सदर मिळकतीस ***"दावामिळकत"*** म्हणुन संबोधण्यात येईल. दावामिळकतीत वादी व प्रतीवादींचे नावे सामाईक कब्जेदार म्हणुन महसुल दप्तरी लागली आहे.

**०३.** वादीचे पुढे कथन की, त्याचे भाऊ व त्यांच्या पश्चात प्रतिवादी यांनी वाद शेतजमीन स्वतःच्या ताब्यात ठेवून तिचा उपभोग घेतला व वादीस त्याच्या हिस्स्यापासून वंचित ठेवले. वादी काही काळापासून यवतमाळ येथे वास्तव्यास असल्याचा फायदा घेऊन प्रतिवादींनी जमीन वहित करून उत्पन्न घेतले. वादीने वेळोवेळी वाटणीची मागणी करूनही

प्रतिवादींनी ती टाळाटाळ केली. सन २०२३ मध्ये काही प्रमाणात जमीन वापरासाठी दिली असली तरी प्रत्यक्ष सरस निरस वाटणी करण्यात आलेली नाही. वादीने दिनांक १२/१०/२०२३ रोजी प्रतिवादींना नोटीस देऊन वाटणीची मागणी केली, मात्र त्यावर कोणतेही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. तसेच प्रत्यक्ष भेट घेऊनही प्रतिवादींनी वाटणी करण्यास नकार दिल्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला.

**०४.** प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. १ ते ११ हे त्यांच्या विधीज्ञांमार्फत न्यायालयात हजर झाले होते. तथापि, न्यायालयाने पुरेसा वेळ दिला असतानाही त्यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल केला नाही. त्यामुळे त्यांच्या विरुद्ध विना लेखी जबाबाचा आदेश निशाणी क्र. १ वर दिनांक ०६/१२/२०२४ रोजी पारित करण्यात आला

**०५.** प्रस्तुत दाव्यात वादीचा दावा, त्यातील मजकूर, सादर कागदपत्रे तसेच अभिलेखावरील उपलब्ध बाबी यांचा सखोल विचार केला असता, वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचा मुख्य विषय हा दावामिळकतीवरील हक्क, तसेच वादीस त्याचा कायदेशीर हिस्सा मिळण्याबाबत केला आहे. प्रतिवादींकडून लेखी जबाब दाखल न झाल्यामुळे, वादीच्या दाव्याच्या आधारे व दावामिळकत मुद्दे निश्चित करून न्यायनिवाडा करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने, न्यायालयाने खालीलप्रमाणे मुद्दे निश्चीत केले.

| **अ. क्र.** | **वा द मु द्दे** | **नि ष्क र्ष** |
|---|---|---|
| **१** | वादी सिद्ध करतो का की, दावामिळकत ही मयत सुर्यभान फागुजी शेंद्रे यांची मालकीची असून वादी | **होकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | व प्रतिवादी हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत? | |
| २ | वादी हा मागणीनुसार दावामिळकतीत त्याचा सरस निरस वाटणी करून हिस्सा वेगळा करून प्रत्यक्ष ताब्यात मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास कितवा हिस्सा? | **होय,** वादी व त्याचे मयत दोन भाऊ वसंतराव व बाबराव तसेच त्यांची बहीण प्रतीवादी क्र. ११ शकुंतला यांना प्रत्येकी ¼ हिस्सा. |
| ३ | काय आदेश व हुकुमनामा? | **वादीचा दावा मंजुर येतो.** |

**<u>– : का र ण मि मां सा :–</u>**

०६. वादीने दावा सिध्द करण्यासाठी त्याच्यातर्फे **<u>साक्षीदार क्र. १</u>** म्हणुन स्वता: वादी मोतीराम सुर्यभान शेंद्रे याचे सरतपासणीचे शपथपत्र (नि. क्र. ३२) वर दाखल केले आहे. तसेच वादींनी खालील कागदोपत्री पुराव्यावर भिस्त ठेवली. त्यानंतर निशाणी क्र. ४२ वर पुरावा बंद करणेकामी दिलेली पुरशीस.

| अ. क्र. | कागदपत्राचा तपशिल | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १ | दावामिळकतीचा ७/१२ उतारे साल सन २०२२ ते २४ | नि. क्र. ३५ व ३६ |
| २ | प्रतिवादी क्र. १, ६ व ११ यांना पाठविलेली दिनांक १२/१०/२०२४ ची नोटीस, | नि. क्र. ३७ |
| ३ | सदर नोटीस पाठविल्याची पोस्ट पावती, | नि. क्र. ३८ |

| | | |
|---|---|---|
| | | |
| **४** | वादीचे वडील सुर्यभान यांचे मृत्यू प्रमाणपत्र, | नि. क्र. ३९ |
| **५** | वादीची आई दुर्गाबाई यांचे मृत्यू प्रमाणपत्र, | नि. क्र. ४० |
| **६** | वादीचा भाऊ वसंतराव यांचे मृत्यू प्रमाणपत्र | नि. क्र. ४१ |

**०७.** प्रतीवादीस प्रस्तुत दाव्यात वेळावेळी त्यांना पुरावा दाखल करण्यासाठी भरपुर संधी देण्यात आल्या, तरीही त्यांनी त्यांचा पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द पुरावा बंद करण्याचा आदेश निशाणी क्र. १ वर दिनांक १६/०३/२०२६ रोजी पारीत करण्यात आला व त्यांचा पुरावा बंद करण्यात आला.

**मुद्दा क्र. १ बाबत**:

***वादी सिद्ध करतो का की, दावामिळकत ही मयत सुर्यभान फागुजी शेंद्रे यांची मालकीची असून वादी व प्रतिवादी हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत?***

०८. या मुद्द्याच्या संदर्भात वादीचे विधीज्ञ यांनी युक्तिवाद केला की, दावामिळकत शेतजमीन ही वादी व प्रतीवादी क्र. ११ हीचे मयत वडील सुर्यभान फागुजी शेंद्रे यांच्या मालकीची होती व त्यांच्या मृत्यूनंतर सदर मालमत्ता त्यांच्या कायदेशीर वारसांकडे आली आहे. यासाठी वादीने स्वतःचा शपथपत्र (Exh. ३२) सादर करून त्यातील संपुर्ण मजकूर हा प्रतीवादी यांनी उलटतपास घेतला नसल्यामुळे अबाधीत राहीलेला आहे.

**०९.** वादीने त्याच्या दाव्याच्या समर्थनार्थ अभिलेखावर दाखल केलेले ७/१२ उतारे (निशाणी क्र. ३५ व ३६) यावरून असे दिसून येते की, दावामिळकत शेतजमीन ही मयत सुर्यभान यांच्या नावे होती व त्यांच्या मृत्यूनंतर सदर जमीन वादी व प्रतिवादी यांची सामाईक नावे नोंदविण्यात आलेली आहे. महसूल नोंदींना कायदेशीर दृष्टीने प्रबळ पुराव्याचे मूल्य असते, जोपर्यंत त्या अव्हानीत होत नाही. तसेच, वादीने मयत सुर्यभान यांचे मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी क्र. ३९) अभिलेखावर दाखल केले असून त्यावरून त्यांचा मृत्यू दिनांक ३०/०७/२००५ रोजी झालेला असल्याचे सिद्ध होते. याशिवाय, वादीची आई व भाऊ यांच्या मृत्यूची प्रमाणपत्रे (निशाणी क्र. ४० व ४१) देखील दाखल करून वारसांचा अनुक्रम स्पष्ट केलेला आहे.

**१०.** वादीच्या साक्षीवरून व अभिलेखावरील कागदपत्रांवरून असे स्पष्ट होते की, वादी व प्रतिवादी हे सर्व मयत सुर्यभान यांचे नैसर्गिक व कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादींनी सदर बाब नाकारण्यासाठी लेखी जबाब दाखल केले नाही तसेच वादीच्या साक्षीचा उलटतपासही घेतलेला नाही. त्यामुळे वादीचा पुरावा अबाधीत राहिलेला आहे. न्यायालयाच्या दृष्टीने, जेव्हा एखादा पुरावा प्रतिपक्षाकडून आव्हानित केला जात नाही, तेव्हा तो स्वीकारण्यास हरकत राहत नाही. प्रस्तुत प्रकरणात वादीचा पुरावा विश्वासार्ह, सुसंगत व दस्तऐवजी पुराव्याने समर्थित आहे. त्यामुळे वादीने हे सिद्ध केले आहे की, दावामिळकत ही मयत सुर्यभान फागुजी शेंद्रे यांची मालकीची होती व वादी व प्रतिवादी हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. करीता, मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष **होकारार्थी** नोंदवितो.

**मुद्दा क्र. २ बाबत**:

***वादी हा मागणीनुसार दावामिळकतीत त्याचा सरस निरस वाटणी करून हिस्सा वेगळा करून प्रत्यक्ष ताब्यात मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास कितवा हिस्सा?***

**११.** या मुद्द्यावर वादीचे विधीज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, दावामिळकत ही मयत सुर्यभान फागुजी शेंद्रे यांची असून त्यांच्या मृत्यूनंतर ती त्यांच्या कायदेशीर वारसांमध्ये अविभाजित स्वरूपात आहे. वादी हा त्यांचा मुलगा असल्यामुळे त्यास कायद्यानुसार समभाग मिळण्याचा अधिकार आहे. वादीने स्पष्टपणे नमूद केले आहे की, त्याचा सदर मालमत्तेमध्ये १/४ असा हिस्सा आहे व तो हिस्सा प्रत्यक्ष ताब्यात मिळावा म्हणून सदर दावा दाखल करण्यात आलेला आहे.

**१२.** वादीने सरतपासणीच्या साक्षीद्वारे (Exh. ३२) असे स्पष्ट केले आहे की, दावामिळकत शेतजमिनीची आजपर्यंत सरस निरस वाटणी झालेली नाही. महसूल नोंदींमध्ये देखील सर्व वारसांची नावे संयुक्तरीत्या नोंदविण्यात आलेली असून कोणतीही विभाजनाची नोंद नाही. यावरून मालमत्ता अजूनही अविभाजित असल्याचे सिद्ध होते. वादीच्या साक्षीवरून पुढे असेही दिसून येते की, प्रतिवादींनी दीर्घकाळ वाद शेतजमिनीचा उपभोग घेतला असून वादीस त्याच्या हिस्स्यापासून वंचित ठेवले आहे. जरी काही कालावधीत वादीस अंदाजे काही जमीन वहितीसाठी देण्यात आली असली तरी ती कायमस्वरूपी व कायदेशीर वाटणी नव्हे. त्यामुळे वादीचा वाटणीचा हक्क अबाधित राहतो. महत्त्वाचे म्हणजे, प्रतिवादींनी या प्रकरणात लेखी जबाब दाखल केलेला नाही, तसेच

वादीच्या साक्षीचा उलटतपासही घेतलेला नाही. परिणामी वादीचा पुरावा अबाधीत राहिलेला आहे. कायद्याच्या तत्वानुसार, अबाधीत व विश्वासार्ह पुरावा स्वीकारण्यास हरकत नसते.

**१३.** वारसांचा विचार करता, मयत सुर्यभान यांच्या मृत्यूसमयी त्यांचे वारस म्हणून वादी, त्यांची आई गिरीजाबाई, दोन भाऊ नामे वसंतराव (वारसदार प्रतीवादी क्र. १ ते ५) व बाबाराव (वारसदार प्रतीवादी क्र. ६ ते १०) व तसेच एक बहिण प्रतीवादी क्र. ११ शकुंतला असे एकूण पाच वारस अस्तित्वात होते. पुढे आई गिरीजाबाई व दोन्ही भाऊ वसंत व बाबारा यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचे हक्क त्यांच्या संबंधित वारसांकडे गेले असले तरी, मूळ हिश्श्याचा आधार घेतल्यास वादीचा हिस्सा १/४ इतका असल्याचे वादीने मांडले आहे व तो कोणत्याही प्रकारे खंडित केलेला नाही. त्यामुळे उपलब्ध पुरावा, महसूल नोंदी, वादीची अप्रतिवादित साक्ष आणि कायदेशीर तत्वांचा विचार करता, वादी हा दावामिळकतीमध्ये त्याचा हिस्सा वेगळा करून प्रत्यक्ष ताब्यात मिळण्यास पात्र आहे. वादीचा हिस्सा १/४ असा निश्चित होतो. करीता मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारर्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत</u>**

***<u>काय आदेश व हुकमनामा?</u>***

**१४.** वरील मुद्दे क्र. १ ते २ वरील चर्चेवरून असे स्पष्ट होते की, दावामिळकत ही वादी व त्याचे मयत दोन भाऊ वसंतराव, बाबाराव व बहीण प्रतीवादी क्र. ११ शकुंतला

यांचे वडील सुर्यभान यांच्या मृत्यूनंतर ते सर्व कायदेशीर वारसदार म्हणून त्या मालमत्तेत समान हक्काने भागीदार आहेत. त्यामुळे वादीस दावामिळकतीत १/४ इतका कायदेशीर हिस्सा प्राप्त होतो, हे वादीने तोंडी व दस्तऐवजी पुराव्याद्वारे सिद्ध केलेले आहे. त्यामुळे वादी हा दावामिळकतीतून त्याचा १/४ हिस्सा सरस निरस वाटणी करून वेगळा मिळविण्यास व त्या हिस्स्याचा ताबा घेण्यास पात्र आहे. परिणामी वादीचा दावा मंजूर करण्यास पात्र आहे. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## आ दे श

१) वादीचा दावा खर्चासह **मंजूर** करण्यात **येतो**.

२) मौजे महागाव (कसबा), ता. दारव्हा, जि. यवतमाळ येथील गट क्र. ३६५, पोट खराबा सहीत क्षेत्रफळ ०१ हे. ५२ आर या दावामिळकतीत **वादी मोतीराम**, मयत वसंतराव, मयत बाबाराव व **प्रतिवादी क्र. ११ शंकुतला** यांचा प्रत्येकी **१/४ हिस्सा** असल्याचे जाहीर करतो. *(**मयत वसंतराव** सुर्यभान शेंद्रे याचा येणा–या १/४ हिस्सामधे त्याचे वारस प्रतिवादी क्र. १ सरस्वती, प्रतिवादी क्र. २ संदिप, प्रतिवादी क्र. ३ प्रविण, प्रतिवादी क्र. ४ अमोल व प्रतिवादी क्र. ५ मंगला **यांचा प्रत्येकी १/२० हिस्सा राहील**. तसेच **मयत बाबाराव** सुर्यभान शेंद्रे याचा येणा–या १/४ हिस्सामधे त्याचे वारस प्रतिवादी क्र. ६ सुलोचना, प्रतिवादी क्र. ७ गजानन,*

*प्रतिवादी क्र. ८ राजू, प्रतिवादी क्र. ९ विजय, प्रतिवादी क्र. १० रूपाली* ***यांचा प्रत्येकी १/२० हिस्सा राहील****)*

३) सदर दावामिळकतीची प्रत्यक्ष वाटणी व हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी हा हुकूमनामा **जिल्हाधीकारी, यवतमाळ** यांच्याकडे पाठविण्यात यावा व त्यांनी लागू असलेल्या कायद्यानुसार दावामिळकतीची वाटणी करून प्रत्येक पक्षकाराचा हिस्सा **वेगळा करून देण्याबाबत** आवश्यक कार्यवाही करावी.

४) येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

Digitally signed by NILESH LAXMANRAO PATIL
Date: 2026.07.14 17:27:50 +0530

**दिनांक – १४/०७/२०२६.** **(निलेश ल. पाटील)**

**ठिकाण –** दारव्हा, यवतमाळ. २ रे सह दिवाणी न्यायधीश क. स्तर, दारव्हा.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| **Name of Stenographer** | **:** | Ku Divya R. Gaikwad<br>Stenographer (Grade 3) |
| **Court Name** | **:** | $2^{nd}$ Jt. CJJD & JMFC Darwha |
| **Date** | **:** | 14/07/2026 |
| **Judgment signed**<br>**by presiding officer on** | **:** | 14/07/2026 |
| **Judgment uploaded on** | **:** | 14/07/2026 |